बुकिंगसाठी संपर्क : ९५९४९९४२१४/१५/१६
ऑफिस : स्वामिनी, चिपळूण-कराड रोड, रेल्वे ब्रीज जवळ, दत्तवाडी, खेर्डी, ता. चिपळूण, फोन: ०२३५५-२५६४८९
साईट: गट नं.२७०, सती चिंचघरी, चिपळूण-कराड रोड.
क्लब हाऊस, ईनडोअर गेम्स, जॉगिंग ट्रॅक्स, लायब्ररी, लिफ्ट पॉवर बॅकअप, रेनवॉटर हार्वेस्टींग, ओपन एअर थिएटर, लहान मुलांचे खेळाचे मैदान, गणेश मंदिर, सुंदर बगीचा, २४ तास पाणी, अन्य भरपूर सुविधा
रेरा रजिस्ट्रेशन नं. P52800008252

शब्दांना सत्याची धार

प्रहार

श्रीराम बोअरवेल्स, सावंतवाडी
9420293799, 7774851004
7588570587, 7768898659

आमचेकडे ४॥'' व ६॥'' बोअरवेल योग्य दरात खुदाई करुन मिळेल. बोअरवेलसाठी पाणी पॉईंट सर्व्हे करुन मिळेल व पाणी न लागलेस संपूर्ण १००% रक्कम परत मिळेल.
(नियम व अटी लागू)

■ शुक्रवार, १६ फेब्रुवारी २०१८ ■ रत्नागिरी ■ नोंदणी क्रमांक : एमएएचएमएआर/२००८/३५१८० ■ वर्ष १४ ■ अंक ९९ ■ पाने ८ ■ ₹ ३ www.prahaar.in

डोकेदुखीने हैराण प्रजा पेनबाम करी काम राजा
उन्हाळा, सर्दी, थंड पाणी ह्या सर्व कारणांमुळे आज आपण डोके दुखीने होता बेजार अहिल्या आयुर्वेदिकने संशोधन करून एक साधा सोपा उपाय केला आहे सादर
'खो-गो' पेनबाम
एकदा वापरून पहा, तुम्हीही म्हणाल 'खो-गो' पेनबाम करी काम राजा.
(आयुर्वेदिक) 'खो-गो'
अहिल्या आयुर्वेदिक औषधायलय, मुंबई ६३.
मोबाईल ९१-८१०८६८०००९ ● सर्वत्र उपलब्ध
बीवायपी/श्री

वेचक

पोटदुखीच्या त्रासामुळे मनोहर पर्रिकर लीलावतीत दाखल

पणजी (गोवा) : गोव्याचे विद्यमान मुख्यमंत्री मनोहर पर्रिकर यांना मुंबईतील लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोटात दुखू लागल्याने मुंबईतील लीलावती रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात येत आहेत. फूड पॉयझनिंगच्या त्रासानंतर पोटात दुखू लागल्याने, प्रथमतः त्यांच्यावर बांबोळी येथील गोमेकॉमध्ये उपचार करण्यात आले. मात्र अधिकच्या उपचारासाठी त्यांना मुंबईत आणण्यात आले आणि लीलावती रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मनोहर पर्रिकर यांची प्रकृती आता सुधारत आहे, अशी माहिती गोव्याच्या मुख्यमंत्री कार्यालयातील सूत्रांनी दिली.

नेपाळमध्ये शेर बहादूर देबुआंनी दिला पंतप्रधानपदाचा राजीनामा

काठमांडू : नेपाळचे पंतप्रधान शेर बहादूर देबुआ यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा दिला आहे. या पदावर आता खडगा प्रसाद ओली येणार आहेत. ओली यांची आता लवकरच शपविधी होणार आहे. देबुआ हे नेपाळचे ४० वे पंतप्रधान होते. २०१७ च्या मे महिन्यात त्या आधीचे पंतप्रधान पुष्पा कमल दहल म्हणजे प्रचंड यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा दिला. आणि त्यांच्या जागी शेर बहादूर देबुआ यांनी पदभार स्विकारला.

सिंधुदुर्गात परप्रांतीय बोटींची घुसखोरी

सरकार काय करत आहे?

नारायण राणे कडाडले

तीव्र आंदोलनाचा इशारा

▶ **मालवण** *(प्रतिनिधी)*

भाजप-शिवसेना युती सरकार बरोबरच येथील लोकांनी निवडून दिलेले शिवसेनेचे आमदार, खासदार आणि पालकमंत्री यांचे सिंधुदुर्गच्या किनारपट्टीवर लक्ष राहिलेले नाही. मुळात त्यांच्यामध्ये कोणताही दम नसल्यामुळे मच्छीमारांवर अन्यायाची ही परिस्थिती ओढावली आहे. प्रशासकीय यंत्रणा आणि राज्यकर्त्यांच्या डोळ्यादेखत परप्रांतीय हायस्पीड नौका बेकायदेशीरपणे घुसखोरी करत आहेत व इथल्या मासळीची लूट करत आहेत. त्यामुळेच सिंधुदुर्गातील मच्छीमार देशोधडीला लागला आहे. शासनाच्या नाकर्तेपणामुळे स्थानिक मच्छीमारांनी परप्रांतिय नौकांविरोधात आंदोलन छेडले तर शासकीय यंत्रणा त्यांच्याविरोधात दरोडा आणि खंडणीसारखे अजामिनपात्र गुन्हे दाखल करत आहे. हे कृत्य निषेधार्ह आहे. गोव्याचे मुख्यमंत्री आपल्या राज्यातील ट्रॉलरवाल्यांसाठी सिंधुदुर्गातील प्रशासनाला कामाला लावतात तर आमचे सरकार काय करत आहे? असा सवाल महाराष्ट्र स्वाभिमान पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी केला.

दरम्यान, या प्रश्नावर मुख्यमंत्री तसेच मत्स्य पान २ वर ▶

मालवणमध्ये गुरुवारी स्थानिक मच्छिमारांना धीर देताना महाराष्ट्र स्वाभिमान पक्षाचे संस्थापक अध्यक्ष नारायण राणे.

बेकायदेशीर मासेमारीविरोधात पारंपरिक मच्छीमार रस्त्यावर

रास्तारोको केल्यानंतर पारंपरिक मच्छीमारांवर कारवाई करताना पोलीस

▶ **रत्नागिरी** *(प्रतिनिधी)*

बंदी कालावधी असतानाही प्रखर वीजेचा वापर करुन मासेमारी करणाऱ्यावर प्रशासनाकडून कारवाई केली जात नाही. याविरोधात आवाज उठविण्यासाठी आज अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हर्णैसह रत्नागिरीतील पारंपरिक मच्छीमारांनी रास्ता रोको करत जेलभर आंदोलन केले. रास्तारोको करणाऱ्या शेकडो मच्छीमारांना पोलिसांनी ताब्यात घेतले. यावेळी बेकायदेशीर मासेमारीवर आळा घालण्यासाठी तटरक्षक दलाची मदत घेतली जाईल असे आश्वासन जिल्हाधिकारी प्रदीप पी. यांनी आंदोलनकर्त्यांना दिली.

राज्य आणि केंद्रशासनाच्या आदेशाची पायमल्ली करून बंदी कालावधीत पर्ससीन मासेमारी मोठ्या प्रमाणात सुरु आहे, आणि त्याला मत्स्य व्यवसाय विभागाचा आर्शिवाद असल्याचा आरोप पारंपारिक मच्छीमारांनी केला आहे. तसेच एलईडी लाईटचा वापर करून मच्छीमारी करण्यास परवानगी नसताना ही पर्ससीन नौका अशा प्रकारची मासेमारी करत आहेत. यांच्यावर कठोर कारवाई व्हावी, यासाठी अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीने गुरूवारी मोर्चा काढला होता. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर समोर आल्यानंतर तेथे आंदोलक रस्त्यावरच ठाण मांडून बसले. या आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या आंदोलनाची शासनाने दखल न घेतल्यास यापुढे उग्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. याप्रसंगी मच्छीमारांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. राज्य व केंद्र शासनाच्या आदेशाची पायमल्ली करुन मत्स्यव्यवसाय खात्याच्या आशिवार्दाने बंदी कालावधीत सुरु असलेल्या पर्ससीन आणि मासेमारीवर कठोर कारवाई करुन तत्काळ बंद करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

शासनाच्या अधिसूचनेनुसार राज्याच्या जलधिक्षेत्रात १ जानेवारी ते ३१ ऑगस्ट या कालावधीत परवानाधारक पर्ससीन नौकांना मासेमारी करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. ३ ऑगस्ट २०१७ च्या केंद्र शासनाच्या आदेशानुसार विशेष आर्थिक क्षेत्रात (इ इ झेड) जबाबदार केंद्रीय प्राधिकरणाकडून परवानगी घेऊन शाश्वत पध्दतीने मासेमारीला परवानगी आहे. इझेडमध्ये एलईडी लाईटद्वारे कोणत्याही प्रकारची मासेमारी करण्यास तसेच नौकेवर जनरेटर बसविण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. तटरक्षक दल आणि तटवर्ती राज्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात नमुद आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या नौकांवर कायदेशीर कारवाई करावयाची आहे. रत्नागिरी मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्तांच्या कार्यक्षेत्रातील सुमारे पावणेसातशे पर्ससीन नौका बेकायदा मासेमारी करत आहेत. त्यापैकी सुमारे २०० हून जास्त नौकांवर केवळ व्हीटीएस बसवून केंद्र शासनाची परवानगी न घेता तसेच प्रतिबंधीत साहित्य बसवून एलईडी लाईटद्वारे विशेष आर्थिक क्षेत्रात पर्ससीन मासेमारी करुन केंद्र शासनाच्या आदेशाची पायमल्ली करीत आहेत. त्यांना मत्स्य व्यवसाय खात्याचे अभय आहे. घातक, बेलगाम मासेमारीमुळे सागरी पर्यावरण पूर्णपणे धोक्यात येऊन सागरी जैवविविधता नष्ट होऊन माशांचे साठे नष्ट होतील, पान २ वर ▶

मुख्यमंत्र्यांच्या भेटीमध्ये शिवसेनेने अशोक वालम यांना वगळले

उद्धव ठाकरेंसोबत जाण्यास संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांचा नकार; सेनेच्या भूमिकेबद्दल ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी

▶ **रत्नागिरी** *(प्रतिनिधी)*

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना कार्यकारी प्रमुख उध्दव ठाकरे यांच्यामधील नाणार रिफायनरीसंदर्भातील बैठकीमधून कोकण रिफायनरी प्रकल्प विरोधी संघर्ष समितीचे अध्यक्ष अशोक वालम यांना वगळण्यात आल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये चीडीचे वातावरण निर्माण झाले होते. या बैठकीला न जाण्याचा निर्णय संघर्ष समितीने तात्काळ घेतला. शिवसेना आंदोलनकर्त्यांमध्ये फूट पाडत असल्याचा आरोप समितीच्यावतीने यावेळी करण्यात आला.

नाणार- राजापूर येथे होऊ घातलेल्या कोकण रिफायनरी प्रकल्पाला तेथील ग्रामस्थांचा तीव्र विरोध आहे. हा प्रदूषणकारी प्रकल्प येथे होता कामा नये अशी त्यांची भूमिका असतानाच केंद्र आणि राज्यामध्ये सत्तेचा वाटेकरी असलेल्या शिवसेनेनेच येथील जनतेला गृहित धरून येथे हा प्रकल्प लादला असल्याची येथील ग्रामस्थांची भावना झाली आहे. या ग्रामस्थांच्या भावनांना वाट मोकळी करून देत त्यांच्या आंदोलनाचे नेतृत्व मुंबईस्थित राजापूरचे सुपुत्र अशोक वालम यांनी केल्यानंतर शिवसेनेला आपली दुतोंडी भूमिका लपविणे ग्रामस्थांपासून अशक्य झाले. केंद्रीय मंत्री, राज्याचे उद्योगमंत्री, पर्यावरण मंत्री, रत्नागिरी- सिंधुदुर्गचे खासदार आणि राजापूरचे आमदार हे शिवसेनेचे असतानाही हा प्रकल्प कसा काय येऊ शकतो असा सवाल ग्रामस्थांनी केल्यानंतर शिवसेनेकडून हे पाप आपले नाही हे सिध्द करण्याचा वारंवार प्रयत्नही करण्यात आला. यासाठी मातोश्रीवर दोन वेळा बैठका घेऊन आम्ही प्रकल्प रद्द करू पान २ वर ▶

फ्लोरिडाच्या हायस्कूलमध्ये फायरिंग

१७ ठार, १४ जखमी

पार्कलंड – साऊथ फ्लोरिडाच्या डगलस हायस्कूलमध्ये एका माजी विद्यार्थ्याने फायरिंग केले. त्यात १७ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये अनेक विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सुमारे १४ जण जखमी झाले आहेत. आरोपी निकोलस क्रूजचे वय १९ वर्षे आहे. तो याच शाळेचा माजी विद्यार्थी आहे. पोलिसांनी त्याला अटक केली आहे. घटनेतील मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

न्यूज एजन्सीच्या मते ही घटना मियामीपासून सुमारे ७२ किमी अंतरावर असलेल्या पार्कलंड परिसरातील मार्जरी स्टोनमॅन डगलस हायस्कूलमध्ये सुटीपूर्वी घडली. आरोपी विद्यार्थ्याला शिस्तभंगामुळे शाळेतून काढून टाकण्यात आले होते, त्यामुळे तो रागात होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपीने आधी शाळेचा फायर अलार्म वाजवला. त्यामुळे पान २ वर ▶

नाणार परिसरातील जमीन खरेदी-विक्री व्यवहारांवर निर्बंध घालावेत

डॉ. विनय नातू यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

▶ **गुहागर** *(प्रतिनिधी)*

राजापूर तालुक्यातील नाणार व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील काही भागात राज्य शासनाच्या औद्योगिक विकास महामंडळातर्फे नियोजित तेल शुध्दीकरण प्रकल्पासाठी भूसंपादनाची प्रकिया सुरू झाली आहे. या प्रक्रियेत स्थानिक जमीनधारकांना न्याय मिळावा याकरिता परप्रांतीयांकडून सुरू झालेल्या जमीन खरेदी-विक्री व्यवहारांवर निर्बंध घालावेत, अशी मागणी भाजपचे प्रदेश चिटणीस डॉ. विनय नातू यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

नाणार येथील नियोजित तेल शुध्दीकरण प्रकल्पासाठी औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने भूसंपादनाची प्रकिया सुरू झाली आहे. यापूर्वी जैतापूर अणुऊर्जा तसेच मुंबई-गोवा चौपदरीकरण कामासाठी भूसंपादन करून पान २ वर ▶

जिल्ह्यातील १६ हजार ३८८ शेतकरी सभासदांना कर्जमाफीचा फायदा

जिल्हा बँकेचे अध्यक्ष डॉ. तानाजीराव चोरगे यांची माहिती

▶ **रत्नागिरी** *(विशेष प्रतिनिधी)*

राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. जिल्हा बँकेकडून पाठवण्यात आलेल्या ४५ हजार कर्जमाफी प्रस्तावांपैकी जवळपास २८ हजार शेतकरी सभासदांच्या कर्जमाफीची रक्कम बँकेकडे उपलब्ध झाली असून, त्यापैकी १६ हजार ३८८ शेतकरी सभासदांना २७ कोटी ६२ लाख इतकी कर्जमाफी देण्यात आली असल्याची माहिती जिल्हा बँकेचे अध्यक्ष डॉ. तानाजीराव चोरगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ते पुढे म्हणाले की, शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतर जिल्हा बँकेकडून शेतकरी सभासदांचे कर्जमाफीचे प्रस्ताव तयार करण्यात आले. त्यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील ४५ हजार ४० शेतकरी सभासदांचे ६५ कोटी ४१ लाख ४९ हजाराच्या कर्जमाफीचे प्रस्ताव शासनाला सादर करण्यात आले होते. त्यातील २८ हजार ६७६ शेतकरी सभासदांच्या प्रस्तावाचे २७ कोटी ६५ लाख २४ हजार इतकी कर्जमाफीची रक्कम बँकेकडे शासनाकडून जमा झाली. त्याप्रमाणे बँकेने १६ हजार ३८८ शेतकरी सभासदांना २७ कोटी ६२ लाख ६९ हजार इतका कर्जमाफीचा लाभ दिला असल्याचे त्यांनी सांगितले.

उर्वरित १२ हजार ३८८ शेतकरी सभासदांच्या कर्जाची रक्कम १०० रूपयांपासून दोन हजारापर्यंत आहे. त्यामुळे शासनाकडून यासंदर्भातील आदेश प्राप्त झाल्यानंतर या शेतकऱ्यांनाही कर्जमाफीचा फायदा दिला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या काही वर्षात जिल्हा बँकेने चांगल्या पद्धतीने प्रगती साधली आहे. बँकेकडून ग्राहकांना विविध सेवा देण्याचा प्रयत्न दिला जात आहे. मार्चअखेर दोन हजार कोटी ठेवी संकलित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. आतापर्यंत १२०० कोटीपर्यंत कर्जव्यवहार झाला असून, बँकेचा सीडी रेशोही ६२ टक्क्यापर्यंत आहे. गतवर्षी जानेवारी २०१७ मध्ये बँकेला पाच कोटी ६० लाखाचा फायदा झाला आहे. यावर्षी तो फायदा दुप्पट झाला असून, १२ कोटी ९७ लाखापर्यंत गेला आहे. मार्चअखेर त्यात आणखी वाढ होईल, असा विश्वास डॉ. चोरगे यांनी व्यक्त केला.

बँकेने कर्जवसुलीतही पान २ वर ▶

इडू प्रकरणात दोन शाखांची चौकशी

चिपळुणातील बहुचर्चित 'इडू'प्रकरणी जिल्हा बँकेने खेर्डी व नरवण शाखेतील व्यवहारप्रकरणी खातेनिहाय चौकशी सुरू केली असल्याचे डॉ. चोरगे यांनी सांगितले. खेर्डी शाखेत याबाबत खाते उघडण्यात आले होते. त्यामध्ये लाखापर्यंत व्यवहार झाले. त्यानंतर गुहागरमधील नरवण शाखेत ही रक्कम ट्रान्सफर करण्यात आली. त्यामुळे दोन्ही शाखांची चौकशी केली जात असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

दुर्गम, अतिदुर्गम भागातील शाळांत महिला शिक्षकांना नियुक्ती न देण्याचे शासनाचे आदेश

▶ **रत्नागिरी** *(विशेष प्रतिनिधी)*

दुर्गम व अतिदुर्गम भागातील शाळांमध्ये महिला शिक्षकांना नियुक्ती देण्यात येऊ नयेत, असे स्पष्ट निर्देश शासनाकडून देण्यात आले आहेत. त्यामुळे दुर्गम व अतिदुर्गम भागातील शाळांमध्ये काम करणाऱ्या महिला शिक्षकांना या निर्णयाने दिलासा मिळाला आहे. जिल्हा परिषदेने अशा शाळा महिला शिक्षकांना काम करण्यास प्रतिकुल म्हणून घोषित करण्याचे आदेशही शासनाकडून देण्यात आले आहेत.

जिल्हा परिषदेतंर्गत असणाऱ्या अनेक शाळा या दुर्गम व अतिदुर्गम भागात आहेत. काही शाळांच्या ठिकाणी पोहोचण्यास पायी दोन-दोन तास चालावे लागते. काही शाळांकडे जाताना जंगलातून व निर्जन ठिकाणावरून जावे लागते. काही शाळा ज्या ठिकाणी आहेत तेथील स्थानिक परिस्थितीमुळे शिक्षकांना मुक्काम करणेदेखील अडचणीचे होते.

अशाठिकाणी महिला शिक्षक देख्धील काम करीत असून, एवढ्या लांब पायी चालून व जंगलातून निर्जन ठिकाणावरून चालणे महिला शिक्षकांसाठी अत्यंत अवघड आहे. या सर्व बाबींचा विचार करून महिला शिक्षकांसाठी प्रतिकुल असलेल्या शाळांमध्ये महिला शिक्षकांसाठी नियुक्ती न देण्याची भूमिका शासनाकडून घेण्यात आली आहे.

यासंदर्भात शासनाकडून आदेश जारी करण्यात आले पान २ वर ▶

नीरव मोदीच्या मालमत्तेवर छापे; मुंबईतील घर सील

- पंजाब नॅशनल बँक घोटाळाप्रकरणी ईडीची कारवाई
- नीरवसह तिघे देश सोडून फरार

पाच हजार शंभर कोटींचे हिरे जप्त

▶ **मुंबई** *(प्रतिनिधी)*

सार्वजनिक क्षेत्रातील दुसऱ्या क्रमांकाची बँक असलेल्या पंजाब नॅशनल बँके (पीएनबी) ला ११ हजार ४०० कोटी रुपयांचा गंडा घालणारा अब्जाधीश हिरे व्यापारी नीरव मोदी आणि अन्य तिघे देश सोडून फरार झाले आहेत. पीएनबीतील घोटाळा उघडकीस आल्यानंतर गुरुवारी या बँकेच्या शेअरमध्ये मोठी घसरण झाली. सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) घोटाळ्याचा सूत्रधार नीरव मोदीची मुंबईसह तीन शहरांतील कार्यालये आणि निवासस्थानांवर छापे टाकून पाच हजार शंभर कोटींचे हिरे जप्त केले आहेत. नीरव मोदी, त्याची आई आणि भावाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून सीबीआयला लूकआऊट नोटीस जारी करण्यास सांगितले आहे.

दरम्यान, आम्ही कोणत्याही चुकीच्या गोष्टीला खतपाणी घालणार नाही. आम्हाला थोडा वेळ द्या, बँक पूर्ण क्षमतेने दोषींवर कारवाई करत आहे, ग्राहक असो वा कर्मचारी गैरव्यवहार करणाऱ्या प्रत्येकावर कारवाई करणार असल्याचे पंजाब नॅशनल बँकेकडून व्यवस्थापकीय संचालक पान २ वर ▶